# एम.बी.मोरे संकुलातील वार्षिक क्रिडामहोस्तवाचा शुभारंभ

दि. २६ डिसेंवर, २०१९ गुरूवार रोजी एम.वी.मोरे फाऊंडेशन सामाजिक सेवा संस्थेच्या धाटाव -रोहा येथील शैक्षणिक संकुलात वार्षिक क्रिडा महोस्तवाच्या उद्घाटन सोहळा संपन्न झाला. या क्रिडा महोस्तवात इंग्लिश मिडीयम स्कूल, कनिष्ठ महाविद्यालय, महीला पदवी महाविद्यालयाचे शनिवार दि.२८ डिसेंवर पर्यंत विविध वार्षिक क्रिडास्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे.

या उद्घाटन समारंभामध्ये एम.वी.मोरे फाऊंडेशन सामाजिक सेवा संस्थेचे संचालक मा.श्री.अशोकराव मोरे या कार्यक्रमाचे उद्घाटक तसेच रोहा कवड्डी असासिऐशनचे सदस्य मा.श्री.रूपेश रटाटे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. रोहा तालुक्याला क्रिडाक्षेत्रात अग्रेसर ठेवण्यात हातभार लावण्यात आगामी काळात एम.वी.मोरे फाऊंडेशनच्या विद्यार्थी नक्कीच सहभागी होतील अशी खात्री मा.श्री.अशोकराव मोरे यांनी यावेळी व्यक्त केली.

महीला महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.हणमंत ढवळे आणि एम.वी.मोरे फाऊंडेशनचे अध्यक्ष मा.श्री.विजयराव मोरे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

Scanned by CamScanner